# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्र. ११/२०१८**

| | |
|---|---|
| १.प्रा. संतोष वसंतराव जाधव | तक्रार अर्जदार |
| विरूध्द | |
| २. श्री. वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे, खुर्द | |
| ३.वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, जि. सांगली | वि. प. |

तक्रारीचे स्वरूप :

तक्रार अर्जामध्ये दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार यांची नेमणूक दि. ११/०७/२००३ रोजी झाली. तक्रारदार शारीरिक शिक्षण या विषयाकरिता शारीरिक शिक्षण संचालक म्हणून वारणा महाविद्यालयामध्ये कार्यरत आहेत. तक्रारदार यांनी दि. १७/०६/२०१४ रोजी नम्र निवेदन करून मा. प्र प्राचार्य यांना बॅंक ऑफ महाराष्ट्र खाते नं. २०२२४२००७८९ या खात्यावर मे, २०१३ मध्ये सहाव्या वेतन आयोग फरक रक्कम अद्यापही जमा न करणे व तसेच विविध मागण्या करणारे नम्र निवेदन दिले म्हणून मा. प्र–प्राचार्य यांनी तक्रारदार यांची जुलै, २०१४ ची वार्षिक वेतनवाढ कोणत्याही प्रकारची चौकशी न करता रोखली आहे.

या संदर्भात विचारणा करणारा पत्रव्यवहार दि. १३/०८/२०१४ रोजी करून व स्मरणपत्र दि. १७/१०/२०१४ रोजी देऊनही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. तरी रोखलेली वेतनवाढ देण्याविषयी व सहाव्या वेतन आयोगाची फरक रक्कम देण्याविषयी संबंधितांना आदेश होणेकरिता तक्रार निवारण समितीकडे तक्रार दिली आहे.

संस्थेचा अभिप्राय:

तक्रारी संदर्भात संस्थेने दिलेला लेखी अभिप्राय खालीलप्रमाणे –

१. सेवाप्रारंभापासून आज अखेर सेल्फ ॲपरायजल/ ए.पी.आय. फॉर्म भरून दिलेले नाहीत.
२. शैक्षणिक अपात्र असल्याने शैक्षणिक पात्रता वाढविणेसंदर्भात सूचना करून देखील शैक्षणिक पात्रता वाढविलेली नाही.
३. सेवेच्या प्रारंभापासून क्रीडा विभागात कोणतेही उल्लेखनीय काम केलेले नाही त्यासंदर्भात सूचना करूनही कोणताही प्रयत्न केला जात नाही.
४. सातत्याने पत्रव्यवहार करून महाविद्यालय व संस्थेची बदनामी करणे.
५. वेतनवाढ रोखण्यासंदर्भात संस्थेने दिलेले आदेश.

महाविद्यालयाचा अभिप्राय:

तक्रारदार श्री. जाधव एस. व्ही. यांना देय असलेली सहावा वेतन आयोगाची फरक रक्कम देणेसंदर्भात महाविद्यालयाने लेखी स्वरूपात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की,

१) तक्रारदार आमच्या महाविद्यालयात शा. शिक्षण संचालक पदावर सन २००३ पासून कार्यरत आहेत. दि. १७/०६/२००० च्या भरतीबंदी आदेशानुसार श्री. जाधव यांना विद्यापीठाची तात्पुरती मान्यता आहे. मा. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, कोल्हापूर कार्यालयाकडून सन २००८–०९ ते २०११–१२ या कालावधीतील अनुदान निर्धारणामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनाची १५,८०,३१४/– इतकी वसूली दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे श्री. जाधव यांना देय असलेली सहावा वेतन आयोगाची फरक रक्कम देणेसंदर्भात मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांना नेमणूकीसंदर्भात तपासणी करावी व फरक रक्कम दिल्यानंतर पुन:श्च चुकीच्या नेमणूकीसंदर्भात फरकाची रक्कम अमान्य करू नये याबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे, परंतु अद्याप उत्तर न आल्याने फरक रक्कम अदा केलेली नाही.

२) श्री. जाधव यांची शैक्षणिक अर्हता B.A. M.Ed असून त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शैक्षणिक पात्रतेच्या निकषाप्रमाणे शैक्षणिक पात्रता पूर्ण करणेसंदर्भात वारंवार तोंडी व लेखी सूचना करूनदेखील शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली नाही.

श्री. जाधव यांचे महाविद्यालयातील क्रीडा कामकाजही असमाधानकारक आहे. तसेच त्यांनी महाविद्यालय सेवेत आल्यापासून सेल्फ अॅपरायजल व ए.पी.आय. फॉर्म भरून दिलेले नसल्यामुळे माहे जुलै २०१४ पासून देण्यात येणारी वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे.

संस्थेतर्फे डॉ. प्रताप पाटील समितीसमोर उपस्थित. त्यांनी मांडलेल्या म्हणण्यानुसार तक्रारदार यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शैक्षणिक पात्रतेच्या निकषाप्रमाणे शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली नाही तसेच महाविद्यालयातील क्रीडा कामकाजामध्ये अनेकवेळेला सूचना देवूनही सुधारणा न केलेने तसेच सेल्फ अॅपरायजल फॉर्म व ए.पी.आय. फॉर्म भरून न दिलेने तक्रारदार यांची माहे जुलै २०१४ पासून वार्षिक वेतनवाढ संस्था आदेशानुसार रोखण्यात आलेली आहे.

सदरचे प्रकरण समितीकडे असताना तक्रारदार यांनी दि. २७/०८/२०१८ रोजी सहावा वेतन आयोग फरक रक्कम मिळाली आहे. तसेच वेतनवाढीच्या संदर्भात कायदेशीर बाबी बघून संस्थेने निर्णय घेण्याचे ठरविले असलेने तक्रार अर्ज निकाली काढणेत यावा असे पत्र दिले. तथापि दि. २५/०९/२०१८ रोजी तक्रारदार यांनी वेतनवाढबाबत संस्था व महाविद्यालयाकडून कोणतीही कार्यवाही न झालेने वेतनवाढ रोखणेबाबत तक्रार अर्ज पुढे चालविणेस लेखी विनंती केली.

समितीच्या असे निर्देशनास आले आहे की, तक्रारदार यांची रोखण्यात आलेली वेतनवाढ ही कायमस्वरूपी आहे किंवा कसे याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. सबब वेतनवाढ रोखण्यापूर्वी नैसर्गिक न्यायतत्त्वाचा अवलंब केलेचे दिसून येत नाही. शिक्षक परिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही केलेचे दिसून येत नाही. संस्थेने वेतनवाढ रोखण्याबाबतची कायदेशीर बाबी पाहून निर्णय घेतलेला नाही, परिनियमातील कार्यपद्धतींचा अवलंब करून तक्रारदार दोषी आढळल्यामुळे त्यांची वेतनवाढ थांबली असल्याबाबत समाधानकारक म्हणणे समितीसमोर आले नाही. त्यामुळे संस्थेची वेतनवाढ रोखण्याबाबतची कार्यवाही न्यायाच्या अनुषंगाने मान्य करता येणार नाही.

## आदेश

तक्रारदार यांचा तक्रारअर्ज मंजूर करण्यात येत आहे. संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांची जुलै २०१४ पासून रोखलेली वार्षिक वेतनवाढ त्वरीत चालू करण्यात यावी. वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत संबंधित तक्रारदार, संस्था आणि महाविद्यालय यांना देऊन तसे कळविण्यात यावे.

दि. २१/०५/२०१९

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

अध्यक्ष
(श्री. ना. गुं. पाटील)

सदस्य
(श्री. अ. अ. कुलकर्णी)

सदस्य
(श्री. प्र. द. राऊत)

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)

सदस्य सचिव
(ॲड. अ. अ. कदम)